# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक ०२.१०.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०१.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १० केसेसमध्ये १० ईसमावर कारवाई करून एकुण ७,७१,६३५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ३१ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये २८ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १२७ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २७७ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ३८ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ७३ केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ३५ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ६९ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०४ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २८ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ४० केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,१८९ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे १३ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये ३० केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,०७० वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ९,३६,७५०/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ४ पथकाची कामगिरी :— अग्निशस्त्राने चालते गाडीतुन हवेत फायर करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०१.१०.२०२६ चे ०१.३० वा. चे सुमारास, फिर्यादी आबिद खान मोहम्मद खान, वय ४८ वर्ष, रा. हसनबाग, नागपूर हे त्यांचे दुचाकी वाहनाने आपले घरी जात असतांना, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील हसनबाग चौक, डीएल मोटर्स दुकानाजवळून फ्लायओव्हरचे खालुन वळण घेत असतांना, त्यांना त्यांचे समोरुन एक क्रेटा कार क्र. एमएच ४९ डीए ३३९९ जातांना दिसली. नमुद गाडीचालकाने खिडकीतुन हात बाहेर काढून त्याचे जवळील अग्निशस्त्राने हवेत फायर करुन, नमुद वाहन हे वेगात हसनबाग चौकाकडे निघुन गेले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे नंदनवन येथे नमुद क्रेटा कारचालक आरोपीविरूध्द कलम ३,२५,२७(१) भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे तपासादरम्यान आरोपी रोशन उर्फ गोटया गायकवाड रा. ज्ञानेश्वरनगर, अजनी, नागपूर याने अग्निशस्त्रातुन हवेत फायर केल्याचे निष्पन्न झाले होते व त्याचा शोध सुरु होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ४ पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना तांत्रिक तपासादरम्यान नमुद आरोपी हा वणी जि. यवतमाळ येथे असल्याची माहिती मिळाल्याने, त्याचे शोधकामी वणी जि. यवतमाळ येथे जाऊन, शोध घेत असता, आरोपी हा पोलीस ठाणे वणी हद्दीत प्रसाद लॉज ॲन्ड बारजवळ उभ्या असलेल्या महेंद्रा एसयुव्ही कार क्र. एमएच ४७ एबी ८८१० मधे मिळुन आला. त्यास पंचासमक्ष ताब्यात घेऊन नाव पत्ता विचारला असता, त्याने आपले नाव रोशन उर्फ गोटया अशोक मोहीते गायकवाड वय ३८ वर्ष रा. ज्ञानेश्वरनगर गेट, प्रेसच्या दुकानाजवळ, मानेवाडा रोड, अजनी, नागपूर असे सांगितले. तो वर नमुद गुन्हयातील आरोपी असल्याची खात्री झाली. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात ०१ आयफोन मोबाईल व ०१ वन प्लस कंपनीचा मोबाईल असे दोन फोन मिळून आल्याने जप्त करण्यात आले. तसेच आरोपीने गुन्हा केल्यानंतर पळुन जाण्याकरीता वापरलेले वर नमुद वाहनही जप्त करण्यात आले आहे. आरोपीस मुद्येमालासह नंदनवन पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (डिटेक्शन) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती संजीवनी थोरात, सपोनि वैभव बारंगे, पोउपनि. जितेशाचारी आरवेल्ली, पोहवा देवेंद्र नवघरे, पोअं. गोविंद देशमुख व चापोअं. श्रीकांत मारवाडे यांनी केली.



**<u>३) हिंगणा पोलीसांची कामगिरी :— जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०१.१०.२०२६ चे १५.०५ ते १६.४० वा. चे दरम्यान, हिंगणा पोलीसांचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत, वृंदावन सिटी, श्री नायडु यांचे घरासमोर कोतेवाडा रोड येथे येथे एका बोलेरो वाहनामधील दोन मुले अवैधरित्या घरगुती सिलेंडर तसेच व्यावसायीक वापराकरीता असलेले सिलेंडरमधील गॅस काढून रिकामे सिलेंडरमध्ये भरत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचे दोन इसम हे बोलेरोच्या पाठीमागील ट्रालीमधुन गरगुती व व्यावसायीक वापराचे सिलेंडर आडवे पाडुन स्टीलचे नळीचे मदतीने अवैधरित्या व सुरक्षेची कोणतीही उपाययोजना न करता, रिकामे व्यावसायीक सिलेंडरमध्ये गॅस भरतांना समक्ष दिसुन आले. पंचासमक्ष त्यांना ताब्यात घेऊन त्यांचे नाव पत्ते विचारले असता, त्यांनी आपले नाव १) दिनेश खेताराम बिष्णोई वय २० वर्ष रा. कानासर ता. बाप जि. पलोदी राजस्थान २) संजय मांगीलाल बिष्णोई वय १९ वर्ष रा. बोजासर ता. अऊ जि. पलोदी, राजस्थान दोन्ही ह.मु. प्लॉट क्र. १४४,३/४५, सिल्व्हर सिटी, श्री दिग्वीजय नायडु यांचे घरी, कोतेवाडा हिंगणा नागपूर असे सांगितले. आरोपींचे ताब्यातुन एचपी कंपनीचे रिकामे व भरलेले दोन घरगुती

सिलेंडर, एचपी कंपनीचे रिकामे व भरलेले सात व्यावसायीक सिलेंडर, ईलेक्ट्रीक वजनकाटा, स्टीलची नळी, बोलेरो पिकअप वाहन क्र. एमएच १२ आरएन ८६७३, सिलींग लेबल, ०१ मोबाईल असा एकुण ७,९७,५००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता अत्यावश्यक व जिवनावश्यक वस्तुंची कृत्रिम टंचाई निर्माण होईल तसेच लोकांचे जिवीतास व मालमत्तेस धोका निर्माण होईल असे कृत्य करतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम जिवनावश्यक वस्तु अधिनियम अन्वये होत असल्याने, आरोपींविरुध्द कलम २८७ भान्यासं. सहकलम ३,७ जिवनावश्यक वस्तु अधिनियम—१९५५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपींना मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. जितेंद्र बोबडे, पोउपनि संतोष राठोड, पोहवा अरुण कांबळे, पोअं. अनिल झाडे, प्रणित बंड यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे वाडी :— हद्पार ईसमास अटक.</u>**

दिनांक ०१.१०.२०२६ चे १७.४० वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, बबलु वानखेडे नावाचा हद्दपार इसम हा जवाहर कॉलेज जवळ फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम दिसुन आला. त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळुन जाण्याचे तयारीत असता, त्यास घेराव करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव बबलू दिवाकर वानखेडे, वय २८ वर्षे, रा. रमाबाई चौक, आंबेडकर नगर, वाडी, नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणून त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३७२६/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे नविन कामठी :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी श्रीमती उषा राजेश गोखे, वय ४१ वर्षे, रा. घर नं. १९२, पाण्याचे टाकीजवळ, कुंभारे कॉलोनी, प्रफल्ल खोब्रागडे यांचे घरी किरायाने, नागपूर यांना प्लॉट खरेदी करायचा असल्याने, त्यांची आरोपी नवाब मोहसिन विलायत खान, रा. गांधीबाग, नागपुर याचेसोबत ओळख झाली. दिनांक १५.०२.२०२६ ते २६.०६. २०२६ आरोपीने मौजा आजनी येथे पहनं. १९, खसरा नं. ५३/१ ही जमीन त्याचे नावावर असल्याचे खोटे सांगुन, एम.के. इन्फ्रास्ट्रक्चर या नावाने जमीनीवर ले—आऊट पाडुन, त्यामधील प्लॉट तो विक्री करीत असल्याचे फिर्यादी यांना सांगुन त्यांचा विश्वास संपादन केला. फिर्यादीचा विश्वास बसल्याने, फिर्यादीने नमुद ले आऊटमधील प्लॉट क्र. १६ खरेदी करण्याबाबत पसंती दर्शविली. आरोपीने नमुद जमीन ही त्याचे मालकीची नसतांनाही, ती त्याची असल्याचे भासवून व खोटे दस्तऐवज तयार करुन, फिर्यादीस पसंत आलेल्या प्लॉटचा करारनामा करुन देवुन फिर्यादीकडून ऑनलाईन तसेच रोख स्वरुपात एकुण ३,३५,०००/— रुपये घेतले. आरोपीला प्लॉटचे रजिस्ट्री करुन मागितली तेव्हा, त्याने टाळाटाळ केली असता, फिर्यादीने आपले पैसे परत मागितले. आरोपीने फिर्यादीस कोणतीही रक्कम परत न करता, तसेच प्लॉटची रजिस्ट्री करुन न देता, फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करून आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्ज चौकशीवरुन पोलीस ठाणे नवीन कामठी येथे पोउपनि. विनायक इंगळे ९२८४८८१०८३ यांनी आरोपींविरूध्द कलम ३१८(४) भान्यासं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे गिट्टीखदान :—** दिनांक ३०.०९.२०२६ चे ११.३० वा. चे सुमारास, इसम नामे आशिष संपत खमटरीया वय ३३ वर्ष रा. गाव खजरी ता. घोगरा जि. मंडला, मध्यप्रदेश ह.मु. पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, एसडीपीएल बिल्डींगचे मागे, शेडामे यांचे शेतात, गिट्टीखदान, नागपूर हा दारुचे नशेत शेतातील विहीरीचे ओटयावर झोपलेला असता, झोपेमध्ये तोल जाऊन, विहीरीचे पाण्यात पडला. त्यास फायर ब्रिगेडचे मदतीने बाहेर काढून उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी मोसिम मोहम्मद कुरेशी वय ३२ वर्षे, रा. नागपुर यांनी दिलेल्या सुचेनवरून, पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. खुशाल राठोड ८४२१२०७३९३ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हिंगणा :—** दिनांक ३०.०९.२०२६ चे २०.३० वा. चे सुमारास, फिर्यादी श्रावण सेवकराम कुंभारे वय ४६ वर्ष रा. नांदेरा, पोस्ट व्याहाड, ग्रामपंचायत सुकडी कलार ता. हिंगणा जि. नागपूर यांचा मुलगा नामे आदित्य श्रावण कुंभारे वय २० वर्षे हा त्याचे नवीन घेतलेल्या व नंबर न मिळालेल्या पांढरे रंगाचे पल्सर २०० मोटार सायकलने पेट्रोल भरण्याकरीता धामना येथे जात असतांना, पोलीस ठाणे हिंगणा हद्यीत, ऑक्मियो लॉजिस्टीक पार्क समोरील पुलाचे कडेला असलेल्या लोखंडी मार्गदर्शक बोर्डचे ॲगलला स्वत: धडकल्याने जखमी झाला. त्यास उपचाराकरीता ग्रामिण रुग्णालय, हिंगणा येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे पोउपनि. शेषराव येलेकर ९९७०६५४६४४ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे नंदनवन :—** फिर्यादी गजानन विठ्ठलराव डेकाटे वय ५० वर्षे, रा. एनआयटी कॉलोनी, ब्लॉक ई—९, व्यंकटेश नगर, नंदनवन, नागपूर यांनी पोलीस ठाणे नंदनवन येथे तक्रार दिली की, त्यांची पत्नी सौ. शुभांगी गजानन डेकाटे, वय ४४ वर्ष ह्या दिनांक २३.०९.२०२६ रोजी पासुन राहते घरुन बेपत्ता झाल्या आहेत.

शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, उंची— ५फुट १ इंच, बांधा—मजबूत, केस—काळे लांब, अंगात— निळ्या सलवार सुट घातलेला आहे. भाषा— मराठी बोलतात. ओळख— उजव्या हातावर जळाल्याचे निशान व इंग्रजीत 'एस जी' गोंदलेले आहे. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे नंदनवन येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**<u>२) पोलीस ठाणे नंदनवन</u> :—** फिर्यादी रजत सुभाष गोटे वय ३२ वर्षे, रा. हिवरी नगर, वाठोडा रोड, यशवंत मेश्राम यांचे घराजवळ, नंदनवन, नागपूर यांनी पोलीस ठाणे नंदनवन येथे तक्रार दिली की, त्यांची पत्नी सौ. शिल्पा रजत गोटे, वय २८ वर्ष ह्या दिनांक २४.०९.२०२६ रोजी पासुन राहते घरुन बेपत्ता झाल्या आहेत. शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—मध्यम, केस—काळे लांब, अंगात— साडी घातलेली आहे. भाषा— मराठी बोलतात. ओळख— डाव्या हातावर 'शिल्पा' गोंदलेले आहे. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे नंदनवन येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




शुभांगी शिल्पा

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**